ePaper

**बिहारमध्ये मोठी दुर्घटना! कामगारांसह बोट उलटली, संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद, बचावकार्य सुरु**




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 27 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


पान 3 वरुन...
मग २०१७ पूर्वीच्या निर्णयांचे काय?





## शंभरहून अधिक भारतीय पर्यटक बेपत्ता; बिहारमध्ये 'रेड अलर्ट'

# नेपाळमध्ये महापुराचा हाहाकार!

महाईन्यूज । काठमांडू

**नेपाळच्या तिबेट सीमेजवळील रासुवा जिल्ह्यात बुधवारी आलेल्या भीषण महापुराने हाहाकार उडवला. भोटे कोशी नदीला अचानक आलेल्या प्रचंड पुराच्या लोंढ्याने काही मिनिटांतच गावे, पूल, रस्ते आणि जलविद्युत प्रकल्पांचे मोठे नुकसान झाले. या दुर्घटनेनंतर नेपाळ पर्यटन मंडळाच्या प्राथमिक यादीनुसार ३८४ पर्यटक व प्रवासी बेपत्ता आहेत. यामध्ये २९१ परदेशी नागरिक असून १०५ भारतीयांचा समावेश आहे. बेपत्ता प्रवाशांमध्ये कैलास मानसरोवर यात्रेवरील अनेक भारतीय यात्रेकरू असल्याने त्यांच्या कुटुंबीयांची चिंता वाढली आहे.**

प्राथमिक माहितीनुसार, तिबेट-नेपाळ सीमेजवळ झालेल्या भूकंपामुळे मोठ्या प्रमाणावर भूस्खलन किंवा बर्फ-खडकांचा ढिगारा नदीच्या प्रवाहात आल्याने पाण्याची पातळी अचानक वाढल्याची शक्यता आहे. नेपाळचे परराष्ट्रमंत्री शिशिर खानाल यांनी संसदेत भूकंपामुळे मोठे भूस्खलन होऊन नदीचा प्रवाह अडल्याचे सांगितले. त्यानंतर अचानक आलेल्या पुरामुळे भोटे कोशी नदीच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर विध्वंस झाला.

पूराच्या तडाख्यात अनेक घरे, वाहने आणि पूल वाहून गेले आहेत. रस्ते व दूरसंचार यंत्रणाही बाधित झाल्याने प्रभावित भागाशी संपर्क साधण्यात अडचणी येत आहेत. नेपाळ लष्कर, पोलीस आणि आपत्कालीन पथकांकडून हेलिकॉप्टरच्या सहाय्याने बचावकार्य सुरू आहे. मात्र, खराब हवामान आणि चिखलामुळे बचावकार्यात अडथळे निर्माण होत आहेत. बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्यासाठी मोठी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या भीषण दुर्घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळच्या नेतृत्वाशी संवाद साधून भारत नेपाळच्या पाठीशी ठामपणे उभा असल्याचे आश्वासन दिले आहे. बचाव आणि मदतकार्यासाठी भारताकडून आवश्यक ती मदत देण्याची तयारी करण्यात आली आहे. दरम्यान, नेपाळमधून भारताकडे येणाऱ्या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन बिहार आणि उत्तर प्रदेशातही सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदीकाठच्या भागातील प्रशासनाला परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, बेपत्ता नागरिकांची संख्या आणि मृतांचा आकडा अद्याप बदलत असून प्रशासनाकडून माहितीची पडताळणी सुरू आहे. त्यामुळे आगामी काही तास नेपाळसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

### बिहारमध्ये 'हाय अलर्ट'

नेपाळमधील भोटे कोशी नदीचे पाणी त्रिशूली नदीतून पुढे भारतातील गंडक आणि कोशी नद्यांमध्ये येत असल्याने बिहारमध्ये पुराचा मोठा धोका निर्माण झाला आहे. या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बिहार सरकार अत्यंत सतर्क झाले असून संपूर्ण राज्यात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### प्रलयाचे नेमके कारण काय?

'बीबीसी'ने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, तिबेटच्या सीमेजवळ आलेल्या भूकंपामुळे मोठ्या प्रमाणावर हिमस्खलन झाले. बर्फाचे डोंगर वेगाने वितळून भोटे कोशी नदीच्या पात्रात साचले आणि नदीची पाणीपातळी अचानक भयानक वेगाने वाढली. पुराचा हा प्रचंड प्रवाह सखल भागातील वस्त्यांवर आदळल्याने ही मोठी आपत्ती ओढवली आहे.





# ‘ग्रोथ इंजिन’ला ‘एमएसएमई’ क्षेत्राची ताकद

## चाकण-भोसरीच्या औद्योगिक भरारीला नवी झेप; तब्बल २,३२०.९७ कोटी रुपयांचे सामंजस्य करार

महाईन्यूज । पुणे

**चाकण-भोसरीच्या औद्योगिक पट्ट्याला नवी ऊर्जा देणा-या ४९ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसोबतच्या (एमएसएमई) सामंजस्य कराराच्या माध्यमातून २ हजार ३२०.९७ कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. या गुंतवणुकीतून उत्पादनक्षमता वाढण्यासोबतच हजारो रोजगारांच्या नव्या संधी निर्माण होतील आणि ग्रोथ इंजिन असणाऱ्या पुणे परिसरातील औद्योगिक परिसंस्थेलाआणखी बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृह येथे हा कार्यक्रम झाला. यावेळी उद्योग (गुंतवणूक व सेवा विभाग) आणि मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंह कुशवाह, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उद्योग विभागाचे अवर सचिव विनोद मेंढे, आयुक्त (एमएसएमई) प्रेरणा देशभ्रतार, विशेष आयुक्त (मैत्री) वैभव वाघमारे, उद्योग विभागाचे उपसचिव अजित सासुलकर तसेच वरिष्ठ अधिकारी आणि कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पुणे आणि परिसरातील ऑटोमोबाईल व अभियांत्रिकी उद्योगांच्या परिसंस्थेत एमएसएमई उद्योगांची भूमिका महत्त्वाची आहे. अनेक उद्योग आपल्या घटकांची आणि सेवांची मोठ्या प्रमाणावर स्थानिक एमएसएमईंकडून खरेदी करतात. अनेक उत्पादनांच्या आयातीला पर्याय निर्माण करून ‘लोकल टू ग्लोबल’ वाटचालीला चालना देण्याचे काम एमएसएमई क्षेत्र करत आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या वाटचालीत आज आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला.



### ‘एमएसएमई’मुळे महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला नवी गती

महाराष्ट्र हे देशाचे ‘ग्रोथ इंजिन’ असून, देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासात राज्याची भूमिका महत्वाची आहे. मोठ्या उद्योगांसाठी आवश्यक घटक, सुटे भाग, सेवा आणि विविध उत्पादनांचा पुरवठा करण्याबरोबरच स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीत एमएसएमई क्षेत्राचा मोठा वाटा आहे. त्यामुळे मोठ्या उद्योगांच्या विस्तारामागे एमएसएमई क्षेत्र मजबूत आधारस्तंभ म्हणून उभे आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

‘एमएसएमई’ क्षेत्राचा नियोजनबद्ध आणि वेगवान विकास करण्यासाठी राज्य शासनाने स्वतंत्र व्यवस्था उभारली आहे. राज्यातील ‘एमएसएमई’ उद्योगांची संख्या, स्वरूप, रोजगारनिर्मिती, उत्पादनक्षमता आणि गरजा यांचा अचूक आढावा घेण्यासाठी ‘एमएसएमई सेन्सस’ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या माहितीच्या आधारे अधिक परिणामकारक धोरणे आणि सुविधा निर्माण करता येतील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

परकीय थेट गुंतवणूक, उद्योग, उत्पादन, स्टार्टअप्स आणि विविध औद्योगिक क्षेत्रांत महाराष्ट्राने देशात आपले अग्रस्थान कायम राखले आहे. उद्योजकांना अधिक चांगल्या सुविधा, सक्षम पायाभूत व्यवस्था आणि उद्योगस्नेही वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील अनेक औद्योगिक वसाहती ३० ते ४० वर्षांपूर्वी विकसित झाल्या असून, बदलत्या काळानुसार त्यांच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आवश्यक आहे. या वसाहतींना ‘औद्योगिक नगरी’चा दर्जा देऊन स्वतंत्र प्रशासन व्यवस्था निर्माण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. स्थानिक करातूनच प्रशासन, स्वच्छता आणि पायाभूत सुविधांचा विकास करण्याची संकल्पना यामागे आहे.

### गुंतवणुकीला प्रत्यक्ष उत्पादनाची गती मिळेल

सामंजस्य करार झालेल्या ४९ ‘एमएसएमई’ उद्योगांना आवश्यक जमीन, पायाभूत सुविधा आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग विभाग आणि एमआयडीसी वेगाने कार्यवाही करणार आहेत. संबंधित उद्योगांनी एक ते दोन वर्षांत उत्पादन सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे या गुंतवणुकीचा लाभ प्रत्यक्ष उत्पादन, रोजगार, व्यवसायाच्या संधी आणि स्थानिक पुरवठा साखळीच्या विस्तारातून दिसून येईल.

# सीओईपी वादाला नवे वळण! काँग्रेस-एनएसयूआयच्या १५० कार्यकर्त्यांवर गुन्हा

महाईन्यूज । पुणे

**सीओईपी विद्यापीठातील विद्यार्थिनीच्या व्हिडीओवरून सुरू झालेल्या वादाला आता वेगळे वळण मिळाले आहे. वसतिगृह परिसरात विनापरवानगी प्रवेश करून घोषणाबाजी, सुरक्षारक्षकांना धक्काबुक्की आणि विद्यार्थ्यांना शिवीगाळ केल्याच्या आरोपावरून काँग्रेस व एनएसयूआयच्या १५० कार्यकर्त्यांविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या घटनेचे वार्तांकन करण्यासाठी वसतिगृह परिसरात आलेल्या एका वृत्तवाहिनीच्या प्रतिनिधीविरुद्धही विद्यापीठ प्रशासनाने तक्रार केली.**

माध्यम प्रतिनिधीवर अशा पद्धतीने तक्रार करणे कितपत योग्य आहे? असा सवाल सर्वच स्तरांतून विचारला जात आहे. विद्यापीठाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी (वसतिगृह विभाग) डॉ. राजू पाचकोर यांनी याबाबतची फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, सीओईपीच्या वसतिगृह परिसरात सुमारे दहा इमारती असून, त्यामध्ये सुमारे दोन हजार विद्यार्थी आणि विद्यार्थिनी राहतात. वसतिगृहात बाहेरील व्यक्तींना पूर्वपरवानगीशिवाय प्रवेश दिला जात नाही.




सुरक्षेसाठी खासगी सुरक्षारक्षक तैनात असल्याचेही प्रशासनाने नमूद केले आहे. दि. १९ ऑगस्ट रोजी एनएसयूआयच्या काही कार्यकर्त्यांनी एका विद्यार्थिनीचा तिच्या इच्छेविरुद्ध व्हिडीओ तयार करून समाज माध्यमांवर प्रसारित केल्याचा आरोप प्रशासनाने केला आहे. या विद्यार्थिनीचा प्रवेश अनाथ विद्यार्थी कोट्यातून झाला असतानाही तिच्याकडून सर्वसाधारण विद्यार्थ्यांप्रमाणे शुल्क आकारण्यात आल्याचा अपप्रचार करण्यास तिला भाग पाडल्याचा दावा तक्रारीत आहे.

या प्रकारामुळे विद्यापीठाची बदनामी झाल्याचेही प्रशासनाने म्हटले आहे. त्यानंतर २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी एनएसयूआय कार्यकर्त्यांनी वसतिगृहाचे गेट जबरदस्तीने उघडून सुरक्षारक्षकांना धक्का देत आत प्रवेश केला.

### प्रशासनाच्या भूमिकेवर सवाल

या प्रकरणात माध्यम प्रतिनिधींवरही तक्रार करण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. विद्यार्थिनीच्या शुल्काबाबतचा वाद आणि त्यानंतर वसतिगृहात झालेल्या आंदोलनाचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या पत्रकारांवर 'विनापरवानगी प्रवेश' केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. वसतिगृहाची सुरक्षा राखणे प्रशासनाची जबाबदारी असली, तरी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे वार्तांकन करणाऱ्या माध्यम प्रतिनिधीवरही तक्रार दाखल करण्याचा निर्णय कितपत योग्य? असा सवाल उपस्थित होत आहे.

## FACT CHECK: प्रस्ताव मागे घेतला म्हणजे घोटाळा?

# मग २०१७ पूर्वीच्या निर्णयांचे काय?

## राष्ट्रवादीच्या सत्ताकाळातही अनेक प्रस्ताव थांबले, मागे घेतले किंवा रद्द झाले



## मोशी बायोगॅस प्रकरणावर मात्र एकतर्फी टीकेचा उद्देश काय?

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी येथील प्रस्तावित बायोगॅस प्रकल्पाचा प्रस्ताव तांत्रिक कारणांमुळे मागे घेण्यात आल्याच्या मुद्द्यावर काही प्रसारमाध्यमांनी नकारात्मक वृत्त प्रसिद्ध करून थेट गैरव्यवहाराचे चित्र निर्माण केले आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या इतिहासाकडे पाहिल्यास प्रस्ताव मागे घेणे, स्थगित करणे किंवा रद्द करणे ही नवीन बाब नसल्याचे स्पष्ट होते. विशेष म्हणजे, २०१७ पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असतानाही महत्त्वाचे प्रस्ताव विविध कारणांमुळे थांबविण्यात आले होते.**




### पाच गॅस दहनभूमींचा प्रस्तावही मागे घेतला होता

सप्टेंबर २०१६ मध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेने पाच गॅस दहनभूमी उभारण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या अजेंड्यावरून मागे घेतला होता. प्रस्तावाबाबत कथित अनियमिततेचे आरोप झाल्यानंतर तत्कालीन आयुक्त दिनेश वाघमारे यांनी प्रस्ताव मागे घेत चौकशी समिती नियुक्त केली होती. चौकशीत आरोपांत तथ्य आढळले नाही तर प्रस्ताव पुन्हा मंजुरीसाठी ठेवला जाईल, अशी भूमिका त्यावेळी घेण्यात आली होती.



TOI City Pune Mumbai Delhi Bengaluru Hyderabad Kolkata Chennai Agra Agartala Ahmedabad

THIS STORY IS FROM SEPTEMBER 4, 2016

**PCMC puts gas crematorium plan on hold**

TNN / Updated: Sep 4, 2016, 08:02 IST

The Pimpri Chinchwad Municipal Corporation has decided to withdraw the proposal for the construction of five gas crematoriums from the standing committee's agenda after corporators cried foul over alleged irregularities. ...Read More

(Representative image)

PIMPRI CHINCHWAD: The Pimpri Chinchwad Municipal Corporation has decided to withdraw the proposal for the construction of five gas crematoriums from the standing committee's agenda after corporators cried foul over alleged irregularities. Municipal commissioner Dinesh Waghmare said, "Adverse news

### झोपडपट्टी पुनर्वसनातील प्रस्तावही बदलावा लागला



**PCMC withdraws plan to trim slum rehab programme**

TNN / Updated: May 18, 2015, 23:55 IST

The Pimpri Chinchwad Municipal Corporation (PCMC) has withdrawn its proposal to curtail slum rehabilitation projects taken up under Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission (JNNURM), as the central government has decided to extend the mission period

TOI

PUNE: The Pimpri Chinchwad Municipal Corporation (PCMC) has withdrawn its proposal to curtail slum rehabilitation projects taken up under Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission (JNNURM), as the central government has decided to extend the mission period by two years.

The civic administration had earlier tabled a proposal at the general body meeting to construct only 8,288 slum tenements instead of the 18,368 proposed tenements.

२०१५ मध्ये जेएनएनयूआरएम अंतर्गत सुरू असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांबाबत महापालिकेला आधीचा प्रस्ताव मागे घ्यावा लागला होता. विविध कायदेशीर, पर्यावरणीय आणि प्रशासकीय अडचणींमुळे प्रकल्पाच्या मूळ आराखड्यात बदल करण्यात आले. काही प्रकल्पांबाबत कामे कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला, तर पुढील काळात मोठ्या प्रमाणावर सदनिकांचे प्रस्ताव रद्द करण्याची वेळही महापालिकेवर आली. त्या काळात राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता होती.

### नगरसेवकांच्या मानधनवाढीलाही ब्रेक



महाराष्ट्र टाइम्स

By THE TIMES OF INDIA

पुणे महाराष्ट्र न्यूज लाइफस्टाइल सिनेमा अर्थ भविष्य टेक करिअर क्रीडा देश More

गुगल न्यूजवर मटासोबत कनेक्ट राहा

ट्रेंडिंग टॉपिक्स मंत्रालय तोंडी नियुक्त्या लोखंडी सळई विद्यार्थी जखमी नाशिक 'सॉरी'चा बॅनर पुणे क्राइम बातम्या तुकाराम मुंढे Amravati Hospi

Marathi News / Maharashtra / Pune News / Pimpri Chinchwad Corporator Payment

**राष्ट्रवादी काँग्रेसचा 'यू टर्न'**

Maharashtra Times • 30 Aug 2016, 3:00 am IST

नगरसेवकांना दरमहा ५० हजार रुपये मानधन देण्याच्या प्रस्तावाला पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत विरोध झाला. त्यामुळे या मुद्द्यावरून 'यू टर्न' घेऊन प्रस्ताव दप्तरी दाखल करण्याची नामुष्की राष्ट्रवादी काँग्रेसवर ओढवली.

२०१६ मध्ये नगरसेवकांचे मासिक मानधन सुमारे ७,५०० रुपयांवरून ५० हजार रुपये करण्याचा प्रस्ताव मोठ्या चर्चेचा विषय ठरला होता. नागरिकांचा विरोध आणि टीकेनंतर हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेने मंजूर न करता स्थगित ठेवला होता. यावरून प्रस्ताव मंजुरीच्या विविध टप्प्यांत बदलू शकतो किंवा थांबविला जाऊ शकतो, हे स्पष्ट होते.

### मग आजच प्रश्न का?

मोशीतील बायोगॅस प्रकल्पाच्या बाबतीत तांत्रिक मुद्दे समोर आल्यानंतर प्रशासनाने प्रस्तावावर फेरविचार करून तो पुढे न नेण्याचा निर्णय घेतला असेल, तर त्याला थेट 'घोटाळा' ठरविण्यापूर्वी संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया तपासणे आवश्यक आहे. प्रस्ताव तयार होणे, निविदा प्रक्रिया होणे, अंतिम मंजुरी मिळणे, कार्यादेश देणे आणि प्रत्यक्ष निधी खर्च होणे या सर्व स्वतंत्र प्रक्रिया आहेत.

महानगरपालिकेच्या प्रशासकीय व्यवस्थेत आयुक्तांना कायदा आणि मंजूर प्रक्रियेच्या चौकटीत प्रस्तावांवर फेरविचार करण्याचे, तांत्रिक बाबी तपासण्याचे आणि आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही थांबविण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे तांत्रिक कारणांमुळे प्रस्ताव मागे घेणे म्हणजे गैरव्यवहाराची कबुली, असा निष्कर्ष आपोआप निघत नाही.

मोशीतील दुर्घटनेची निष्पक्ष चौकशी झालीच पाहिजे आणि दोषींवर कारवाईही झाली पाहिजे. मात्र, दुर्घटनेचा मुद्दा आणि स्वतंत्र प्रशासकीय प्रस्ताव एकत्र करून नकारात्मक वातावरण निर्माण करण्याऐवजी वस्तुस्थिती, अधिकृत कागदपत्रे आणि संपूर्ण निर्णयप्रक्रिया नागरिकांसमोर ठेवणे आवश्यक आहे.

### पिंपरी-चिंचवडकरांची अपेक्षा

पिंपरी-चिंचवडकरांना कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर राजकीय आरोप-प्रत्यारोप नव्हे, तर पारदर्शक आणि कायमस्वरूपी उपाययोजना अपेक्षित आहेत. मोशीतील दुर्घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कचरा प्रक्रिया प्रकल्पांची तांत्रिक आणि पर्यावरणीय तपासणी अधिक काटेकोरपणे व्हावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. कोणताही प्रस्ताव तांत्रिक कारणांमुळे मागे घ्यावा लागत असेल, तर त्यामागील कारणे स्पष्ट करून अधिक सक्षम पर्याय समोर आणावा. वाढत्या शहरासाठी आधुनिक, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापन व्यवस्था उभारणे हीच आजची खरी गरज असून, राजकारणापेक्षा पिंपरी-चिंचवडकरांच्या आरोग्याला, पर्यावरणाला आणि शहराच्या भवितव्याला प्राधान्य मिळावे, अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.



### "महाईन्यूज" ची भूमिका

प्रश्न उपस्थित करणे हा प्रसारमाध्यमांचा अधिकार आहे; पण २०१५-१६ मध्ये प्रस्ताव मागे घेणे ही प्रशासकीय प्रक्रिया असू शकते, तर २०२६ मध्ये तोच निकष थेट घोटाळा कसा ठरतो, असा आमचा स्पष्ट सवाल आहे.




## भूमिका

**अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात बालकांच्या अतिदक्षता कक्षाला लागलेल्या आगीत तीन निष्पाप बाळांचा झालेला मृत्यू हा केवळ एक अपघात नाही, तर आपल्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या संवेदनशीलतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी शोकांतिका आहे.**

# निष्पाप जीवांचा बळी; व्यवस्था मात्र बेफिकीर!





जगाचे दर्शनही न घेतलेल्या या कोवळ्या जीवांचा आगीत होरपळून मृत्यू व्हावा, यापेक्षा दुर्दैवी दुसरे काय असू शकते? ज्या रुग्णालयात जीवन वाचविण्याची जबाबदारी असते, तिथेच मृत्यूने थैमान घालणे ही व्यवस्थेची गंभीर अपयशाची निशाणी आहे. या दुर्घटनेत परिचारिकांनी जीव धोक्यात घालून अनेक बाळांना सुरक्षित बाहेर काढले, हे निश्चितच कौतुकास्पद आहे.

मात्र, केवळ कर्मचाऱ्यांच्या धाडसावर व्यवस्था चालू शकत नाही. रुग्णालयातील अग्निसुरक्षा, विद्युत यंत्रणा, व्हेंटिलेटर, इन्क्युबेटर, बेबी वॉर्मर यांची नियमित तपासणी कोण करणार? फायर ऑडिटची मुदत संपलेली असताना प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष का केले? या प्रश्नांची उत्तरे केवळ चौकशी समितीच्या अहवालात नव्हे, तर जबाबदारी निश्चित करून कृतीतून मिळायला हवीत.

यापूर्वी भंडारा येथील रुग्णालयात नवजात बालकांचा आगीत मृत्यू झाला. त्यानंतरही धडा घेतला गेला नाही, हे अधिक वेदनादायी आहे. प्रत्येक दुर्घटनेनंतर समिती नेमली जाते, काही कर्मचाऱ्यांवर कारवाई होते, आश्वासने दिली जातात; मात्र काही काळाने सारे पूर्वपदावर येते. त्यामुळे जनतेचा चौकशी समित्यांवरील विश्वास कमी होणे स्वाभाविक आहे.

मुळात प्रश्न केवळ एका रुग्णालयाचा नाही. सरकारी आरोग्य यंत्रणेची देखभाल, मनुष्यबळ, औषधे, यंत्रसामग्री आणि बांधकाम यामध्ये खासगी सहभाग वाढत असताना त्यावर प्रभावी सरकारी नियंत्रण आहे का, हा मूलभूत प्रश्न आहे. गोरगरीब नागरिकांना खासगी रुग्णालयांचा प्रचंड खर्च परवडत नाही. त्यामुळे सरकारी रुग्णालये त्यांच्यासाठी आशेचा शेवटचा आधार असतात. त्या आधारालाच जर निष्काळजीपणाची कीड लागली, तर सर्वाधिक फटका सामान्य माणसालाच बसतो. आता दोषारोपांच्या पलीकडे जाऊन कठोर सुधारणा करण्याची वेळ आली आहे. प्रत्येक सरकारी रुग्णालयाचे नियमित फायर ऑडिट, विद्युत सुरक्षेची तपासणी, अत्यावश्यक यंत्रांची गुणवत्ता चाचणी आणि आपत्कालीन परिस्थितीसाठी नियमित सराव बंधनकारक झाला पाहिजे. दोषी अधिकारी कितीही मोठ्या पदावर असला तरी त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे.

निष्पाप बाळांच्या मृत्यूला केवळ 'दुर्दैवी घटना' म्हणून विसरून चालणार नाही. या आगीत तीन जीव गेले आहेत; पण त्यासोबत व्यवस्थेवरील विश्वासही जळाला आहे. तो विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी सरकारने आश्वासन नव्हे, तर जबाबदारी, पारदर्शकता आणि ठोस कृती दाखवावी. अन्यथा प्रत्येक दुर्घटनेनंतर मनात एकच प्रश्न राहील—बाळांनो, आम्हाला माफ करा!

## प्रासंगिक »

### हुशार चिमणी

**एका जुन्या वाड्याच्या छपराखाली एक चिमणी आपल्या पिलांसोबत राहत होती. एके दिवशी वाड्याचा मालक छप्पर दुरुस्त करण्यासाठी माणसे बोलावणार असल्याचे तिला कळले. चिमणीने लगेच पिलांना दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी नेण्याचा निर्णय घेतला.**

पण पिले म्हणाली, "आई, आपले घर इतके सुंदर आहे. आपण ते सोडून का जायचे?" चिमणी म्हणाली, "घर सुंदर असले तरी संकटाची चाहूल लागल्यावर सावध होणे महत्त्वाचे आहे."

दुसऱ्याच दिवशी कामगार आले. त्यांनी छप्पर काढायला सुरुवात केली. पिलांना आईचा निर्णय योग्य असल्याचे समजले.

काही दिवसांनी दुरुस्ती पूर्ण झाली. चिमणीने पुन्हा आपले घरटे बांधले. यावेळी तिने ते अधिक मजबूत आणि सुरक्षित जागी बांधले. पिलांनी विचारले, "आई, तुला संकट आधी कसे समजले?" चिमणी हसून म्हणाली, "ज्याचे डोळे उघडे असतात, त्याला संकट येण्यापूर्वीच त्याची चाहूल लागते."

- तात्पर्य : संकट येण्याची वाट पाहण्यापेक्षा वेळीच सावध होणे शहाणपणाचे आहे.

जातनिहाय जनगणना ही केवळ आकडेवारी गोळा करण्याची प्रक्रिया नाही, तर सामाजिक वास्तव समजून घेऊन भविष्यातील धोरणांची दिशा ठरविणारे महत्त्वाचे साधन आहे

## २०२७ची जात जनगणना दिशादर्शक ठरू द्या!



त्यामुळे २०२७ची जात जनगणना अचूक, विश्वासार्ह आणि उपयोगी असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, २०११च्या सामाजिक, आर्थिक आणि जात जनगणनेतील चुका पुन्हा होण्याची शक्यता निर्माण झाली असेल, तर ती गंभीर बाब आहे. २०११मध्ये खुल्या पद्धतीने जात नोंदविण्याची मुभा देण्यात आली होती. परिणामी तब्बल ४६.७३ लाख वेगवेगळी जातनावे नोंदवली गेली.

समान जातीची वेगवेगळी नावे, शब्दलेखनातील फरक, उपजाती, गोत्र आणि कुळ यांचा समावेश झाल्याने संपूर्ण आकडेवारी गोंधळाची ठरली. या माहितीचे अधिकृत जातयादीशी वर्गीकरण करणे कठीण झाले आणि अखेरीस हा डेटा धोरणनिर्मितीसाठी अपेक्षित उपयोगाचा ठरला नाही. आता २०२७मध्येही 'ओपन-एंडेड' पद्धतीचा अवलंब केला जाणार असल्याचे समोर येत आहे. व्यक्तीने सांगितलेले जातनाव जसेच्या तसे नोंदवले गेले, तर पुन्हा लाखो प्रकारच्या नोंदी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात डेटा शुद्धीकरण, वर्गीकरण आणि पडताळणीसाठी मोठा वेळ जाईल. जातनिहाय आरक्षण, कल्याणकारी योजना आणि सामाजिक न्यायाच्या धोरणांसाठी अचूक आकडेवारीची गरज असताना अशी पद्धतच प्रश्नांकित ठरते. सरकारने बिहार आणि तेलंगणाने अवलंबलेल्या पद्धतीचा गांभीर्याने विचार करायला हवा. अधिकृत आणि प्रमाणित जातयादीच्या आधारे माहिती नोंदविल्यास आकडेवारी अधिक सुसंगत राहू शकते. जात सांगू इच्छित नसलेल्या व्यक्तींसाठी स्वतंत्र पर्याय ठेवण्याची तरतूदही करता येऊ शकते. त्याचबरोबर जातीनुसार सामाजिक-आर्थिक स्थिती, शिक्षण, व्यवसाय, उत्पन्न, जमीनमालकी आणि घराची परिस्थिती यांसारखी माहिती संकलित केली तर जनगणनेचे महत्त्व आणखी वाढेल.

ओबीसींसह एससी, एसटी, एनटी, डीएनटी आणि इतर सामाजिक घटकांना न्याय देण्यासाठी अचूक माहिती ही पहिली गरज आहे. राजकीय वादापलीकडे जाऊन सरकारने वैज्ञानिक आणि पारदर्शक पद्धत स्वीकारली पाहिजे. २०११चा अनुभव समोर असताना त्याच चुका पुन्हा करणे म्हणजे जनतेचा पैसा, वेळ आणि अपेक्षा वाया घालवणे होय. २०२७ची जात जनगणना इतिहासातील आकडेवारी बनू नये; ती सामाजिक न्यायाच्या भविष्यासाठी विश्वासार्ह आधार बनली पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



ढेकरें जेवण दिसे साचें ।
नाहीं तरि काचें कुंथाकुंथी ॥१॥

हे ही बोल ते ही बोल ।
कोरडे फोल रुचीविण ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# साखरेचा 'गोडवा' महागला!

## Blinkit, DMart मध्ये खरेदीवर मर्यादा; ग्राहकांना मर्यादितच साखर मिळणार

**महाईन्यूज । मुंबई**

**जगातील साखर उत्पादनासाठी दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या भारतातच साखरेचा तुटवडा निर्माण झाला आहे. आगामी काळात भारतात सणासुदीचे दिवस सुरू होणार आहेत. अशा परिस्थिती साखरेची कमतरता निर्माण होऊ नये म्हणून क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म्स आणि किरकोळ विक्रेत्यांनी साखर विक्रीवरच मर्यादा आणल्या आहेत. इकॉनॉमिक टाईम्सने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**




उदाहरणार्थ, पुण्यात ब्लिंकिट काही विशिष्ट साखर ब्रँडच्या १ किलोच्या केवळ तीनच पिशव्या कार्टमध्ये जोडण्याची परवानगी देत आहे. बिगबास्केटने विशिष्ट ब्रँडच्या १ किलोच्या जास्तीत जास्त पाच पिशव्यांपर्यंत खरेदी मर्यादित केली आहे. दिल्ली-एनसीआरमधील स्विगी इन्स्टामार्टवरही साखरेच्या खरेदीवर मर्यादा घालण्यात आली असून, काही ठिकाणी ग्राहकांना १ किलो साखरेच्या केवळ दोनच पिशव्या ऑर्डर करण्याची मुभा आहे. झेप्टो आणि इतर किरकोळ विक्रेत्यांनीही मालाचा साठा व्यवस्थापित करण्यासाठी आणि साखर पूर्णपणे संपू नये यासाठी अशाच प्रकारचे निर्बंध लादले आहेत.

आकडेवारीनुसार, सोमवारी साखरेची कमाल विक्री किंमत ७६ रुपये प्रति किलो होती, तर बहुतांश ठिकाणी असणारा दर ६५ रुपये प्रति किलो होता. सरकार आणि साखर उद्योग संघटनांनी सांगितलं की, गेल्या काही दिवसांत कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या साखरेचे दर कमी झाले आहेत. मात्र, त्याचा परिणाम अद्याप किरकोळ बाजारात दिसणं बाकी आहे. गेल्या एका महिन्यात किरकोळ किमतीत झपाट्याने वाढ झाल्याने गरीब आणि मध्यमवर्गीय जनतेला याचा मोठा आर्थिक फटका बसत आहे. आकडेवारीनुसार, सोमवारी साखरेचा घाऊक दर ५९.२३ रुपये प्रति किलो होता, जो एका महिन्यापूर्वी ४५.३५ रुपये आणि एका वर्षापूर्वी ४३.०१ रुपये प्रति किलो होता.

### साखरेची किंमत ६४ रुपयांवर

दरम्यान, दरवाढ रोखण्यासाठी सरकारने अलीकडेच घेतलेल्या उपायांचे परिणाम दिसू लागल्याने किरकोळ बाजारात साखरेच्या किमतीची घोडदौड सुरूच असून, साखर प्रति किलो ६४ रुपयांवर पोहोचली आहे. सोमवारी साखरेची सरासरी किंमत ६३ रुपये रुपये प्रति किलो होती. उपभोक्ता व्यवहार मंत्रालयाच्या (किंमत नियंत्रण विभाग) आकडेवारीनुसार, २५ ऑगस्ट रोजी संपूर्ण भारतात साखरेचा सरासरी दर ६३.९७ रुपये प्रति किलोवर पोहोचला, जो एका महिन्यापूर्वीच्या ४८.८९ रुपये प्रति किलो दरापेक्षा ३१ टक्क्यांनी जास्त आहे. गेल्यावर्षी ४६.३१ रुपये प्रती किलो साखर होती. त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा ३८ टक्क्यांनी साखरेच्या किमतीत वाढ झाली आहे.

### फक्त ५ किलोच साखर मिळणार?

साखरेचा तुटवडा निर्माण झाल्याने किमतीत ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे बिगबास्केट, ब्लिंकिट, झेप्टो आणि स्विगी इन्स्टामार्ट यासारख्या क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म्सने साखरेच्या विक्रीवर मर्यादा आणली आहे. तर, डी मार्टसारख्या रिटेल स्टोअर्सनेही साखरेच्या उपलब्धतेवरून चिंता निर्माण करून विक्रीवर निर्बंध आणले आहेत. त्यानुसार, दिल्ली-एनसीआर भागात ब्लिंकिटवर ग्राहक काही विशिष्ट ब्रँडसाठी प्रत्येकी ५ किलोची जास्तीत जास्त एकच पिशवी खरेदी करू शकतात, तर इतर ठिकाणी हे नियम वेगळे आहेत.

---

# रिक्षा-टॅक्सी चालकांवर मराठीची सक्ती करण्याचा सरकारला अधिकार आहे का?

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबईत रिक्षा किंवा टॅक्सी पकडताना तुम्ही "कुठे जायचं?" एवढं विचारता... आता त्या प्रश्नाचं उत्तर देण्यासाठी चालकाला मराठी येणं अनिवार्य असणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयाची सर्वत्र चर्चा सुरू आहे. मुंबईच्या रस्त्यांवरची काळी-पिवळी टॅक्सी आणि रिक्षा शहराच्या रोजच्या धावपळीचा एक भाग बनली आहे. रेल्वेस्थानकापासून ऑफिस, बाजार आणि घरापर्यंत पोहोचण्यासाठी लाखो मुंबईकर दररोज रिक्षा-टॅक्सीतून प्रवास करतात.**



अनेक जण रिक्षाचालकांशी मराठीतच बोलतात, यावर रिक्षाचालक मात्र हिंदीत उत्तर देतात. आता दैनंदिन प्रवासात रिक्षाचालकांनाच भाषेची परीक्षा द्यावी लागणार आहे. अमराठी रिक्षाचालकांना प्रवाशांशी मराठी बोलणं अनिवार्य असणार आहे. मराठी बोलता येत नसेल तर त्याचं प्रशिक्षण घेण्याची अट घालण्यात आली आहे.

२० ऑगस्टपासून आरटीओकडून चालकांना मराठी बोलता येतं की नाही हे तपासलं जातंय, नोटिसा दिल्या जात आहेत. दरम्यान, राज्यात मराठी भाषा प्रशिक्षण अभियान सुरू करण्यात आलं आहे. याअंतर्गत दीड लाखांहून अधिक रिक्षाचालकांचं प्रशिक्षण पूर्ण झालं आहे. मात्र, शिल्लक रिक्षाचालकांनी अद्याप प्रशिक्षण घेतलेलं नाही, त्यांना मराठी शिकण्यासाठी प्रारंभी एक महिन्याची आणि आवश्यकतेनुसार पुढील तीन महिन्यांची अशी चार महिन्यांची मुदत दिली जाणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मात्र, काही चालकांनी सरकारच्या या निर्णयाविरोधात आंदोलने केली, तर सध्या तीन दिवसांचा संपही पुकारला आहे. या मुद्द्यावरून रिक्षाचालकांच्या उपजीविकेचा प्रश्न समोर येत आहे, तर राजकीय संघर्षदेखील निर्माण झाला आहे.

हा वाद केवळ चालकांना मराठी येते की नाही, इतक्यापुरता मर्यादित नाही. या निर्णयामुळे मोठा प्रश्न उभा राहतोय. एखादा व्यवसाय करण्यासाठी प्रादेशिक भाषेचं ज्ञान अनिवार्य करण्याचा अधिकार सरकारला किती आहे आणि त्याची अंमलबजावणी नेमकी कशी होणार?

### मराठी चाचणी नेमकी काय?

महाराष्ट्र सरकारने १२ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये बदल केला. त्यानुसार व्यावसायिक प्रवासी वाहनांच्या चालक आणि परमिटधारकांसाठी मराठी भाषेचं व्यवहार्य ज्ञान या अटीचा समावेश करण्यात आला आहे. रिक्षा, टॅक्सीसोबतच अन्य ॲपवर चालणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मीटर कॅब्सनादेखील हा नियम लागू असणार आहे.

# भारत-चीन सीमावादावर तोडगा का नाही?

## २०२० मधील गलवान संघर्षानंतर भारत आणि चीनमध्ये संवादाचे मार्ग पुन्हा सुरू

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**२०२० च्या गलवान संघर्षानंतर भारत-चीन संबंधांमध्ये निर्माण झालेला तणाव कमी करण्यासाठी दोन्ही देश पुन्हा संवादाचा मार्ग स्वीकारत आहेत. मात्र, सीमेवर शांतता राखणं आणि प्रत्यक्ष सीमावाद सोडवणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्यात बीजिंगमध्ये झालेल्या २५ व्या विशेष प्रतिनिधी बैठकीत दोन्ही बाजूंनी संबंध सुधारण्यावर आणि सीमा भागात शांतता राखण्यावर सविस्तर चर्चा पार पडली.**




भारत आणि चीनमधील संबंध पूर्वपदावर आणण्यासाठी विशेष प्रतिनिधींच्या (SR) चर्चेला महत्त्व आहे. २०२० च्या लष्करी संघर्षानंतर दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये कटुता निर्माण झाली. ती कमी करून पुन्हा संवाद आणि सहकार्याचा मार्ग तयार करण्याचा प्रयत्न या चर्चेतून होत आहे. मात्र, दोन्ही देशांमधील धोरणात्मक मतभेद अजूनही कायम आहेत.

दोन्ही देशांतील सीमा-वादावर तोडगा काढण्यासाठी आधी 'जॉइंट वर्किंग ग्रुप'च्या माध्यमातून चर्चा होत होती. मात्र, या चर्चेत फारशी प्रगती झाली नाही, त्यामुळे २०२३ मध्ये विशेष प्रतिनिधींची (SPECIAL REPRESENTATIVES) यंत्रणा सुरू करण्यात आली. सीमा प्रश्नावर राजकीय पातळीवर तोडगा काढण्यासाठी हे व्यासपीठ तयार करण्यात आलं. आजही सीमावाद कायम असला तरी दोन्ही देशांमधील तणावाच्या काळात संवाद सुरू ठेवण्यासाठी ही यंत्रणा महत्त्वाची ठरत आहे.

यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात एप्रिल २०१८ मध्ये वुहान येथे आणि ऑक्टोबर २०१९ मध्ये मामल्लपुरम येथे झालेल्या बैठकीनंतर दोन्ही देशांमध्ये एक 'स्ट्रॅटेजिक गाइडन्स मेकॅनिझम' तयार झाला होता. हा संवाद प्रभावीपणे सुरू असल्याचं भारताला वाटत होतं. मात्र, गलवानमधील घटनांनी भारताचा हा विश्वास चुकीचा ठरवला.

गलवानच्या सीमेवरून दोन्ही देशांच्या सैन्याला माघारी घेण्यासाठी राजकीय, राजनैतिक आणि लष्करी पातळीवर अनेक बैठका घ्याव्या लागल्या. त्यानंतर काही भागांमध्ये बफर झोन तयार झाले आणि दोन्ही बाजूंच्या गस्तीच्या पद्धतीत बदल करण्यात आले. मात्र, देपसांगचा प्रश्न कायम वादाचा मुद्दा ठरला आहे.

ऑक्टोबर २०२४ मध्ये रशियातील कझान येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट झाली. ब्रिक्स परिषदेदरम्यान झालेल्या या भेटीनंतर दोन्ही देशांमधील संबंध सुधारण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली.

यानंतर ऑगस्ट २०२५ मध्ये दिल्लीत झालेल्या २४ व्या विशेष प्रतिनिधी बैठकीत १० मुद्द्यांवर सहमती झाली. यामध्ये २००५ च्या राजकीय मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी, सीमा व्यवस्थापन मजबूत करणं, सीमा प्रश्नावर तज्ज्ञ गट तयार करणं, प्रभावी सीमा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र कार्यकारी गटाची स्थापना, लष्करी-राजनैतिक यंत्रणा सुरू ठेवणे आणि सीमापार नदी सहकार्य आणि पारंपरिक सीमा व्यापारी केंद्रे पुन्हा सुरू करणे अशा योजनांचा समावेश होता.

या मुद्द्यांमुळे काही ठोस बदलही झाले. भारत-चीन थेट विमानसेवा पुन्हा सुरू झाली, व्हिसाच्या नियमांमध्ये काही सवलती देण्यात आल्या आणि कैलास मानसरोवर यात्रेलाही पुन्हा सुरुवात झाली.

### गलवान ते कझान; संबंध सुधारण्याची सावध सुरुवात

२०२० मधील गलवान संघर्षानंतर भारत-चीन संबंध अनेक दशकांतील सर्वांत खालच्या पातळीवर गेले. पूर्व लडाखमध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (LAC) चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीने जैसे थे स्थिती बदलण्याचा प्रयत्न केल्याने हा संघर्ष निर्माण झाला. या घटनेमुळे भारताच्या राजकीय आणि लष्करी नेतृत्वाला मोठा धक्का बसला.

### २५ व्या विशेष प्रतिनिधी बैठकीत काय घडलं?

मेजर जनरल जी. जी. द्विवेदी (निवृत्त) यांनी नमूद केले की, २५ व्या विशेष प्रतिनिधी बैठकीत भारत आणि चीनने द्विपक्षीय संबंधांचा सकारात्मक आढावा घेतला. कझान (ऑक्टोबर २०२४) आणि तियानजिन (ऑगस्ट २०२५) येथील मोदी-जिनपिंग भेटीतून संबंध सुधारण्यावर सकारात्मक चर्चा होत असल्याचं दोन्ही देशांनी नमूद केलं.

# मुलांना सोशल मीडियाचे व्यसन लावले? चौफेर घेराबंदीनंतर 'मेटा' झुकली

**महाईन्यूज । अमेरिका**

**मुलांना आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे व्यसन लावले, त्यांच्या सुरक्षिततेबाबत जनतेची दिशाभूल केली आणि संमतीशिवाय माहिती (डेटा) गोळा केली, अशा आरोपांवरून दाखल झालेले खटले मिटवण्यासाठी 'मेटा प्लॅटफॉर्म्स' (META PLATFORMS) १६.६८ अब्ज डॉलर्स देण्यास सहमत झाली आहे.**




कॅलिफोर्नियातील फेडरल न्यायालयात २९ राज्यांनी दाखल केलेल्या खटल्याच्या सुनावणीदरम्यान हा करार झाला असून, यानुसार, मेटाला आता फेसबुक आणि इंस्टाग्रामवर किशोरवयीन वापरकर्त्यांसाठी 'दैनंदिन वापराची मर्यादा' (DAILY USAGE LIMITS) आणि 'रात्रीच्या वेळी वापरण्यावर निर्बंध' (NIGHTTIME USAGE BLOCKS) यांसारखी वैशिष्ट्ये लागू करावी लागतील.

या करारानुसार केवळ आर्थिक दंड भरून मेटाची सुटका होणार नसून, कंपनीला आपल्या प्लॅटफॉर्मच्या कार्यपद्धतीत मोठे बदल करावे लागणार आहेत. मुले आणि किशोरांचा सोशल मीडियावर जास्तीत जास्त वेळ जावा यासाठी वापरल्या जाणाऱ्या फीचर्सवर यापुढे कडक मर्यादा असतील.यापूर्वी मेटाने न्यायालयासमोर दावा केला होता की, "सोशल मीडियाचे व्यसन" ही कोणतीही मान्यताप्राप्त मानसिक वैद्यकीय स्थिती नाही, त्यामुळे युजर्सची दिशाभूल करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतु वाढता न्यायालयीन दबाव आणि लाखो डॉलर्सच्या संभाव्य दंडाच्या पार्श्वभूमीवर अखेर मेटाने तडजोडीचा मार्ग स्वीकारला.

### मेटाने आपल्यावरील सर्व आरोप फेटाळले

न्यायालयीन कागदपत्रांनुसार, या तडजोडीनंतरही मेटाने आपल्यावरील सर्व आरोप फेटाळले असून कोणतीही चुकीची कृती केल्याचे मान्य केलेले नाही. तथापि, कंपनीने अमेरिकेतील किशोरांसाठी (टीनेजर्स) फेसबुक आणि इंस्टाग्राम वापरावर दैनंदिन मर्यादा (DAILY LIMITS) आणि रात्रीच्या वेळी वापरावर निर्बंध (OVERNIGHT RESTRICTIONS) यांसारखे महत्त्वाचे बदल लागू करण्याचे मान्य केले आहे. या कराराच्या वृत्तानंतर प्री-मार्केट ट्रेडिंगमध्ये मेटाचे शेअर्स ४.४ टक्क्यांनी वधारले.

# ‘मूठोन’पासून ‘टॉक्सिक’पर्यंतचा मोठा प्रवास

अभिनेता यशचा बहुचर्चित ‘टॉक्सिक’ चित्रपट प्रदर्शित झाला असून या चित्रपटाची चर्चा केवळ यशच्या स्टारडममुळेच नाही, तर दिग्दर्शक गीतू मोहनदास यांच्यामुळेही होत आहे. ‘लायर्स डायस’ आणि ‘मूठोन’सारख्या वेगळ्या आणि आशयपूर्ण चित्रपटांसाठी ओळखल्या जाणाऱ्या गीतू यांनी पहिल्यांदाच मोठ्या बजेटच्या कमर्शियल चित्रपटाची जबाबदारी घेतली आहे. त्यामुळे त्यांची खास फिल्ममेकिंग शैली एवढ्या मोठ्या व्यावसायिक चौकटीत किती टिकते, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. गीतू मोहनदास यांच्या चित्रपटांमध्ये केवळ कथा सांगण्यापेक्षा व्यक्तिरेखांच्या मनातील संघर्षाला अधिक महत्त्व दिलं जातं. त्यांच्या ‘मूठोन’ या चित्रपटात ओळख, अस्तित्व आणि परिस्थितीनुसार बदलणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्यात आला होता. ‘लायर्स डायस’मध्ये एका महिलेचा आपल्या हरवलेल्या पतीच्या शोधातील प्रवास दाखवण्यात आला. मात्र, हा प्रवास केवळ पतीला शोधण्यापुरता मर्यादित राहत नाही. स्थलांतरित कामगार, त्यांचं आयुष्य आणि समाजव्यवस्थेतील दुर्लक्ष यांसारखे मुद्देही चित्रपटातून समोर येतात. गीतू यांच्या चित्रपटांमध्ये प्रत्येक गोष्टीला स्पष्ट उत्तर मिळेलच असं नाही. त्या प्रेक्षकांना विचार करण्यासाठी मोकळं अवकाश देतात. त्यामुळे त्यांची शैली मुख्य प्रवाहातील नेहमीच्या मनोरंजनापेक्षा वेगळी मानली जाते. ‘टॉक्सिक’ हा यशच्या स्टारडमला साजेसा मोठ्या प्रमाणावर तयार करण्यात आलेला गँगस्टर चित्रपट आहे. मोठं बजेट, मोठे सेट, ॲक्शन, भव्य दृश्यं आणि यशची लोकप्रियता या सगळ्यामुळे गीतू यांच्यासमोर मोठं आव्हान आहे. मोठ्या व्यावसायिक चित्रपटात अनेकदा स्टारची प्रतिमा आणि प्रेक्षकांच्या अपेक्षा कथानकावर प्रभाव टाकतात. अशा परिस्थितीत गीतू यांची स्वतःची शैली किती जपली जाते, हे महत्त्वाचं ठरणार आहे. ‘KGF’नंतर यशची पडद्यावरची प्रतिमा मोठ्या प्रमाणात बदलली. त्याचा स्वॅग, ॲक्शन, हिंसा आणि दमदार व्यक्तिमत्त्व यामुळे त्याची एक वेगळी सिनेमॅटिक ओळख निर्माण झाली आहे. मात्र, गीतू मोहनदास यांच्यासाठी हीच गोष्ट एक संधीही ठरू शकते. त्यांनी यापूर्वी कलाकारांच्या लोकप्रिय प्रतिमेपलीकडे जाऊन त्यांच्या व्यक्तिरेखा सादर केल्या आहेत. त्यामुळे यशच्या सुपरस्टार प्रतिमेला केवळ पुढे नेण्याऐवजी त्याला वेगळ्या पद्धतीने मांडण्याची संधी गीतू यांच्याकडे आहे. ‘टॉक्सिक’च्या प्रमोशनल सामग्रीमध्ये मोठ्या प्रमाणावर ॲक्शन, गँगस्टर विश्व, भव्य सेट आणि यशचा दमदार अंदाज पाहायला मिळतो. चित्रपटात अनेक महत्त्वाच्या महिला व्यक्तिरेखाही आहेत. त्यामुळे कथा केवळ पुरुषप्रधान गँगस्टर जगाभोवती फिरते की त्यामध्ये महिलांचा वेगळा दृष्टिकोनही दिसतो, हे चित्रपट पाहिल्यानंतरच स्पष्ट होईल. गीतू यांच्या आधीच्या चित्रपटांमध्ये ॲक्शन किंवा हिंसा असली तरी ती केवळ प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी वापरलेली नव्हती. त्या प्रसंगातून व्यक्तिरेखेची मानसिकता समोर आणण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. ‘टॉक्सिक’मध्येही हेच वैशिष्ट्य कायम राहिलं तर मोठ्या बजेटची भव्यता आणि दिग्दर्शकाची खास शैली यांचा चांगला मेळ साधला जाऊ शकतो. ‘टॉक्सिक’कडे गीतू मोहनदास यांचा कमर्शियल सिनेमाकडे वळलेला प्रवास म्हणून पाहण्यापेक्षा त्यांच्या शैलीची नवी परीक्षा म्हणून पाहता येईल. आतापर्यंत त्यांनी छोट्या आणि जवळच्या विश्वातील व्यक्तिरेखांमधून ओळख, संघर्ष आणि अस्तित्वाचे प्रश्न मांडले. आता त्याच गोष्टी त्या मोठ्या पडद्यावर, मोठ्या बजेटमध्ये आणि सुपरस्टारसोबत मांडत आहेत.



# इशिता दत्ता, प्रतीक गांधी आणि अर्शद वारसींचा 'घमासान'




प्रतीक गांधी, अर्शद वारसी आणि इशिता दत्ता यांच्या 'घमासान' या बहुप्रतीक्षित क्राइम थ्रिलरचा ट्रेलर अखेर रिलीज झाला आहे. तिग्मांशु धुलिया दिग्दर्शित या सिनेमात प्रतीक गांधी प्रामाणिक IPS अधिकारी आदित्यच्या भूमिकेत दिसणार असून अर्शद वारसीने खूंखार डाकू महाराजची भूमिका साकारली आहे. मध्य भारतातील बीहडांच्या पार्श्वभूमीवर कायदा, गुन्हेगारी, सत्ता, राजकारण आणि बदला यांचा थरारक खेळ या सिनेमात पाहायला मिळणार आहे. ओटीटीवर दमदार क्राईम थ्रिलर पाहण्याची उत्सुकता असलेल्या प्रेक्षकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. प्रतीक गांधी, अर्शद वारसी आणि इशिता दत्ता यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'घमासान'चा बहुप्रतीक्षित ट्रेलर अखेर रिलीज झाला आहे. दिग्दर्शक तिग्मांशु धुलिया यांच्या या सिनेमात कायदा आणि गुन्हेगारी यांच्यातील थरारक संघर्ष पाहायला मिळणार 'घमासान'च्या सुमारे 1 मिनिट 53 सेकंदांच्या ट्रेलरमध्ये मध्य भारतातील बीहडांची पार्श्वभूमी दिसते. एका बाजूला प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ आयपीएस अधिकारी आदित्यची भूमिका प्रतीक गांधी यांनी साकारली आहे, तर दुसऱ्या बाजूला अर्शद वारसीचा महाराज हा खूंखार डाकू आहे. महाराजच्या दहशतीने संपूर्ण परिसर हादरलेला असताना त्याला पकडण्याची जबाबदारी आदित्यवर सोपवली जाते. मात्र ही लढाई केवळ पोलीस विरुद्ध डाकू अशी साधी नसून त्यामागे सत्ता, राजकारण, जातीय समीकरणे, निष्ठा आणि वैयक्तिक बदला यांचाही मोठा खेळ असल्याचे ट्रेलरवरून जाणवते. तिगमानशू धुईला यांच्या दिग्दर्शनाखालील घमासानचा ट्रेलर प्रेक्षकांना सत्ता, पाठलाग आणि अस्तित्वाच्या संघर्षाने भरलेल्या एका खडतर जगाची पहिली झलक दाखवतो. हिंदी पट्ट्याच्या पार्श्वभूमीवर आधारित घमासानमध्ये तिगमानशू यांची वैशिष्ट्यपूर्ण कथाकथनशैली दिसून येते. जी अशा नैतिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या जगात रुजलेली आहे, जिथे सत्ता आणि अस्तित्वाचा संघर्ष क्वचितच सोपी उत्तरे देतो. प्रतीक गांधी, अर्शद वारसी आणि इशिता दत्त यांच्या मुख्य भूमिका यात बघायला मिळणार आहे.

# जसप्रीत बुमराहचं सिंहासन हिसकावलं!

## ३६ वर्षीय मिचेल स्टार्क पहिल्यांदाच ठरला कसोटीतील वर्ल्ड नंबर वन गोलंदाज

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**कसोटी क्रिकेटमधील वर्ल्ड नंबर वन गोलंदाजाचा ताज जसप्रीत बुमराहकडून हिरावला गेला आहे. ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने ICCच्या पुरुष कसोटी गोलंदाजी क्रमवारीत मोठी झेप घेत कारकिर्दीत पहिल्यांदाच अव्वल स्थान पटकावलं आहे. ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने ICCच्या पुरुष कसोटी गोलंदाजी क्रमवारीत मोठी झेप घेत कारकिर्दीत पहिल्यांदाच अव्वल स्थान पटकावलं आहे.**




बुमराहने फेब्रुवारी २०२४ मध्ये पहिल्यांदा क्रमवारीत अव्वल स्थान मिळवलं होतं. त्यानंतर जवळपास दोन वर्षे त्याचं या स्थानावर वर्चस्व राहिलं. मात्र, श्रीलंकेविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेत बुमराह सहभागी नसलयाने स्टार्कने बांगलादेशविरुद्धच्या मालिकेत दमदार कामगिरी करत क्रमवारीच्या शिखरावर धडक मारली.

मॅके येथे झालेल्या दुसऱ्या कसोटीत स्टार्कने बांगलादेशविरुद्ध भेदक गोलंदाजी करत सामन्यात तब्बल १० विकेट्स घेतल्या. त्याच्या या शानदार कामगिरीमुळे त्याने ताज्या क्रमवारीत दोन स्थानांची झेप घेत बुमराह आणि न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज मॅट हेन्री यांना मागे टाकलं.



३६ वर्षांच्या मिचेल स्टार्कसाठी हे मोठं यश आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील १५ वर्षांच्या कारकिर्दीत त्याने सातत्याने अव्वल १० गोलंदाजांमध्ये स्थान मिळवलं आहे. ॲशेस मालिकेत इंग्लंडविरुद्ध दमदार कामगिरी केल्यानंतर तो अलीकडेच टॉप-३ मध्ये पोहोचला होता. मात्र, क्रमवारीतील अव्वल स्थान त्याच्यापासून दूरच राहिलं होतं. आता अखेर स्टार्कने कसोटी क्रिकेटमधील नंबर-१ गोलंदाज होण्याचा मान मिळवला आहे.

स्टार्क अव्वल स्थानी पोहोचल्यामुळे जसप्रीत बुमराह दुसऱ्या क्रमांकावर, तर मॅट हेन्री तिसऱ्या क्रमांकावर घसरला आहे. ऑस्ट्रेलियाच्या इतर गोलंदाजांनीही क्रमवारीत मोठी झेप घेतली आहे. कर्णधार पॅट कमिन्सने मॅके कसोटीत सहा विकेट्स घेतल्यानंतर त्याने चौथ्या स्थानावर मजल मारली आहे. तर अनुभवी फिरकीपटू नॅथन लायनने दोन स्थानांची झेप घेत पुन्हा टॉप-१०मध्ये प्रवेश केला असून तो १०व्या क्रमांकावर पोहोचला आहे.

### फलंदाजीतील क्रमवारी

भारत आणि श्रीलंका यांच्यातील कसोटी मालिकेदरम्यान जाहीर झालेल्या आयसीसी क्रमवारीत भारताच्या फलंदाजांना फायदा झाला. इंग्लंडच्या हॅरी ब्रुकने ८७४ रेटिंगसह अव्वल स्थान कायम राखलं आहे. दरम्यान, ऋषभ पंतने उल्लेखनीय कामगिरी केली असून, तो सहा स्थानांची प्रगती करत ७११ रेटिंगसह सातव्या स्थानावर पोहोचला आहे. शुबमन गिलचं रेटिंगही ७११ आहे; याचा अर्थ रेटिंग आणि मानांकनाच्या बाबतीत हे दोन्ही खेळाडू सध्या समान पातळीवर आहेत. न्यूझीलंडच्या रचिन रवींद्रनेही दोन स्थानांची प्रगती करत सहावं स्थान गाठलं आहे.

# आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६: क्रिकेट सामन्यांचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**२०व्या आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन यंदा जपानमध्ये करण्यात आले असून, जपानमधील आइची-नागोया येथे १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२६ दरम्यान ही स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेतील क्रिकेट सामन्यांचे संपूर्ण वेळापत्रक समोर आले आहे. काही क्रीडा प्रकारांची सुरुवात १० सप्टेंबरपासूनच होणार आहे. या स्पर्धेत भारताचे महिला आणि पुरुष क्रिकेट संघ पुन्हा एकदा पदकांचे प्रबळ दावेदार मानले जात असून त्यांचे सामने कधी आणि किती वाजता होणार आहेत, ते जाणून घेऊया.**




आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष आणि महिला क्रिकेट स्पर्धांकडे क्रीडाप्रेमींचे विशेष लक्ष लागले आहे. मागील आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघांनी सुवर्णपदक जिंकले होते आणि यंदाही दोन्ही संघ जेतेपदाचे मुख्य दावेदार आहेत. पुरुष गटात भारतीय संघाचा पहिला सामना २८ सप्टेंबरला होणार असून महिला संघ आपला पहिला सामना १८ सप्टेंबरला खेळणार आहे. प्रत्येक दिवशी दोन सामने खेळवले जाणार असून पहिला सामना सकाळी ९ वाजता, तर दुसरा सामना दुपारी २ वाजता सुरू होईल.

गट अ मध्ये अफगाणिस्तान, जपान, नेपाळ हे संघ असून गट ब मध्ये हाँगकाँग-चीन, मलेशिया, ओमान यांचा समावेश आहे; तसेच भारत, पाकिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका या संघांना थेट प्रवेश मिळाला आहे.

### पुरुष गटाचे संपूर्ण वेळापत्रक:

- २४ सप्टेंबर २०२६ – अफगाणिस्तान विरूद्ध जपान
- २४ सप्टेंबर २०२६ – हाँगकाँग-चीन विरूद्ध मलेशिया
- २५ सप्टेंबर २०२६ – हाँगकाँग-चीन विरूद्ध ओमान
- २५ सप्टेंबर २०२६ – अफगाणिस्तान विरूद्ध नेपाळ
- २६ सप्टेंबर २०२६ – जपान विरूद्ध नेपाळ
- २६ सप्टेंबर २०२६ – मलेशिया विरूद्ध ओमान
- २८ सप्टेंबर २०२६ – पाकिस्तान विरूद्ध ब गटातील दुसऱ्या स्थानावरील संघ
- २८ सप्टेंबर २०२६ – भारत विरूद्ध अ गटातील दुसऱ्या स्थानावरील संघ
- २९ सप्टेंबर २०२६ – श्रीलंका विरूद्ध अ गटातील विजेता संघ
- २९ सप्टेंबर २०२६ – बांगलादेश विरूद्ध ब गटातील विजेता संघ
- १ ऑक्टोबर २०२६ – क्वालिफायर-१ विजेता संघ विरूद्ध क्वालिफायर-४ विजेता संघ
- १ ऑक्टोबर २०२६ – क्वालिफायर-२ विजेता संघ विरूद्ध क्वालिफायर-३ विजेता संघ
- ३ ऑक्टोबर २०२६ – कांस्यपदकासाठीचा सामना
- ३ ऑक्टोबर २०२६ – अंतिम सुवर्णपदक सामना

### महिला क्रिकेट स्पर्धेचे वेळापत्रक:

- १७ सप्टेंबर २०२६ – बांगलादेश विरूद्ध चीन
- १७ सप्टेंबर २०२६ – पाकिस्तान विरूद्ध थायलंड
- १८ सप्टेंबर २०२६ – श्रीलंका विरूद्ध मलेशिया
- १८ सप्टेंबर २०२६ – भारत विरूद्ध जपान
- २० सप्टेंबर २०२६ – नंबर-२ टीम विरूद्ध नंबर-३ टीमचे विजेते संघ
- २० सप्टेंबर २०२६ – नंबर-१ टीम विरूद्ध नंबर-४ टीमचे विजेते संघ
- २२ सप्टेंबर २०२६ – कांस्यपदकासाठीचा सामना
- २२ सप्टेंबर २०२६ – अंतिम सुवर्णपदक सामना

ADMISSION OPEN

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

Employability Enhancement Foundational Course In

Data Management, Visualization, and Analytical Modelling

Eligibility : Second year passed, B.Sc (Comp/ Stat/ Maths) / /BCA/ BCS, /B. E / B.Tech, any Diploma or Equivalent



- 10000+ STUDENTS SUCCESSFULLY COMPLETED OUR VARIOUS COURSES
- 25 YEARS OF EXPERIENCE IN EDUCATION
- 100% PLACEMENT ASSISTANCE

Scan the QR code!

Register Now https://www.icit.org.in

VLSI DESIGN & RESEARCH CENTRE

VLSI | Savitribai Phule Pune University | iCiT

Integrated Circuit and Information Technology Pvt. Ltd.,

Department of Electronics and Instrumentation Science,
Savitribai Phule Pune University, Pune 411007
Contact : 8669668900/100, 9922219219
Email : info@icit.org.in /

# जुनी सांगवी येथे मोकाट कुत्र्याचा हल्ला

## महिलेच्या पायाला कुत्र्याचा चावा; हातातील एक वर्षीय बाळही जखमी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवडमधील जुनी सांगवी येथे बाळाला कडेवर घेऊन जाणाऱ्या महिलेवर भटक्या कुत्र्याने हल्ला केल्याची घटना बुधवारी (दि. २६) सकाळी घडली. कुत्र्याने महिलेच्या पायाला चावा घेतल्याने घाबरलेल्या महिलेचा तोल गेला आणि तिच्या हातातील बाळ खाली पडून जखमी झाले. सकाळी सुमारे ११ वाजता मधुबन हाऊसिंग सोसायटीजवळ ही घटना घडली. या घटनेचा व्हिडीओ समोर आल्यानंतर पिंपरी-चिंचवड परिसरातील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.**



व्हिडीओमध्ये एक महिला तिच्या एक वर्षाच्या बाळाला कडेवर घेऊन रस्त्यावरून जाताना दिसत आहे. त्याचवेळी पार्क केलेल्या कारच्या मागून अचानक एक कुत्रा बाहेर येतो आणि महिलेवर झडप घालत तिच्या पायाला चावा घेतो. त्यानंतर दुसराही कुत्रा कारमागून बाहेर येऊन या कुत्र्यासह तेथून पळून जाताना दिसतो.

कुत्र्याने अचानक केलेल्या हल्ल्यामुळे महिला घाबरते. भीती आणि वेदनेमुळे तिचा तोल जातो आणि हातातील बाळ जमिनीवर पडते. त्यामुळे बाळाला दुखापत होते.

हल्ल्याचा आवाज ऐकून परिसरातील काही नागरिक तातडीने घटनास्थळी धावून येतात. व्हिडीओमध्ये नागरिक बाळाला शांत करताना तसेच महिलेची विचारपूस करताना दिसत आहेत. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

भटक्या कुत्र्यांबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र, तक्रारी करूनही प्रभावी कारवाई झालेली नसल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे.

चिखली, जुनी सांगवी, वाकड, भोसरी आणि चिंचवडे नगर परिसरात भटक्या कुत्र्यांचे आक्रमक कळप नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहेत. विशेषतः लहान मुले, बाळांना घेऊन जाणाऱ्या महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या ही महापालिकेच्या प्राणी जन्मनियंत्रण आणि रेबीज प्रतिबंधक लसीकरण कार्यक्रमातील त्रुटींशी संबंधित असल्याचे रहिवासी आणि प्राणी कल्याण कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

निर्बीजीकरण केंद्रांची मर्यादित क्षमता तसेच कुत्र्यांना तात्पुरते ठेवण्यासाठी उपलब्ध पिंजऱ्यांची कमतरता यामुळे मोठ्या संख्येने भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणे कठीण होत असल्याचेही सांगितले जात आहे. जुनी सांगवीतील या घटनेनंतर भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांना आळा घालण्यासाठी महापालिका प्रशासन ठोस पावले कधी उचलणार? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### पाच वर्षांच्या मुलीवरही झाला होता हल्ला

भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या गंभीर घटनांमुळेही नागरिकांमध्ये संताप आहे. अलीकडेच चिखली येथे सात भटक्या कुत्र्यांच्या कळपाने पाच वर्षांच्या मुलीवर हल्ला केला होता. या हल्ल्यात मुलगी गंभीर जखमी झाली होती. तिच्यावर उपचार करताना ८० पेक्षा अधिक टाके घालावे लागले होते.

### कुत्रा चावण्याच्या घटनांत वाढ

महापालिकेच्या अधिकृत आकडेवारीनुसार, पिंपरी-चिंचवड परिसरात कुत्रा चावण्याच्या नोंदवलेल्या घटनांमध्ये गेल्या काही वर्षांत मोठी वाढ झाली आहे. २०२१-२२ मध्ये सुमारे १३ हजार ८०० घटना नोंदल्या गेल्या होत्या. ही संख्या २०२५-२६ मध्ये ३८ हजारांहून अधिक झाली आहे.

# आयसीएमआर महाविद्यालयात डेलनेट डिजिटल ग्रंथालय प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर अँड मॅनेजमेंट रिसर्च (आयसीएमआर), दुडुळगाव येथे ग्रंथालय विभागाच्या वतीने शिक्षकवर्गासाठी 'डेलनेट प्रशिक्षण कार्यशाळेचे' यशस्वी आयोजन करण्यात आले. शिक्षकांना आधुनिक डिजिटल ग्रंथालयीन साधने, ई-संसाधने आणि संशोधनविषयक माहितीचा अध्यापनात प्रभावी वापर करता यावा, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.**



कार्यशाळेस डेलनेटचे वरिष्ठ नेटवर्क सहाय्यक रोहिदास भीमराव राठोड हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी डेलनेटच्या विविध सेवांची सविस्तर माहिती देत ई-पुस्तके, ई-जर्नल्स, संशोधन लेख, संदर्भ साहित्य व ऑनलाइन ग्रंथसूची शोधण्याच्या पद्धती प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे शिक्षकांना समजावून सांगितल्या.

डॉ. सोनाली वळसे (संचालिका, आयसीएमआर): शिक्षक व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच संशोधनविषयक प्रगतीसाठी डिजिटल ग्रंथालयीन साधनांचा वापर अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

प्रा. सचिन मेलगावे (ग्रंथपाल): त्यांनी या संपूर्ण कार्यशाळेचे नेटके आयोजन व सूत्रसंचालन/समन्वय केले.

कार्यक्रमास डॉ. आकाश गवाडे, प्रा. शाहूराज येवते, प्रा. रुपाली शेंडे, प्रा. कौठेकर, प्रा. गोविंद आणि प्रा. वैष्णवी मिर्चे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून शुभेच्छा

या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार विलास लांडे, सचिव सुधीर मुंगसे, खजिनदार अजित गव्हाणे, विश्वस्त विक्रांत लांडे व सुमित मुंगसे यांनी आयोजक व सहभागी शिक्षकांचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.या प्रशिक्षणामुळे शिक्षकांच्या अध्यापन आणि संशोधनाच्या गुणवत्तेत मोलाची भर पडणार असून कार्यशाळेला शिक्षकवर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

"आजच्या आधुनिक व तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण आणि संशोधनाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. प्राध्यापक आणि संशोधकांना जागतिक दर्जाचे ई-साहित्य सहज उपलब्ध व्हावे, या उद्देशाने आयसीएमआर महाविद्यालयात डेलनेट प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथालयीन डिजिटल साधनांचा आणि ई-संसाधनांचा प्रभावी वापर केल्यास अध्यापनाची आणि संशोधनाची गुणवत्ता निश्चितच उंचावेल. अशा नाविन्यपूर्ण कार्यशाळांमुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांना आपल्या ज्ञानाची क्षितिजे विस्तारण्यासाठी मोठी मदत होईल.

- विलास लांडे, संस्थेचे अध्यक्ष व भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार.

# चिंचवडमध्ये “आमदार आपल्या दारी” उपक्रमातून नागरिकांच्या समस्या सोडवण्याचा संकल्प!

## आमदार शंकर जगताप यांचा पुढकार; प्रभाग क्रमांक १६ मध्ये होणार उपक्रम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**नागरिकांच्या विविध समस्या थेट जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर चंद्रभागा पांडुरंग जगताप यांच्या वतीने ‘आमदार आपल्या दारी’ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत गुरुवार, २७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत रावेत येथील समीर लॉन्स, रावेत, पिंपरी-चिंचवड येथे नागरिकांशी संवाद साधण्यात येणार आहे.**

या वेळी नागरिकांना शासकीय योजना, शासकीय दाखले, रेशनकार्ड, तसेच जनसामान्यांच्या तक्रारी, महापालिकेशी संबंधित तक्रारी, वीज, पाणी आणि ड्रेनेजच्या समस्या मांडता येणार आहेत. नागरिकांच्या समस्या संबंधित अधिकारी व शासकीय विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

नागरिकांनी आपल्या तक्रारीसंदर्भातील आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची संधी मिळणार असून, त्यांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ७५७५२९९९९९ असे आवाहन करण्यात आले आहे.




> “नागरिकांच्या समस्या सोडविणे हीच आमची प्राथमिकता आहे. ‘आमदार आपल्या दारी’च्या माध्यमातून नागरिकांना आपल्या अडचणी थेट मांडता याव्यात आणि त्यावर संबंधित अधिकारी व शासकीय यंत्रणांच्या उपस्थितीत तातडीने मार्ग काढता यावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. शासकीय योजना, दाखले, रेशनकार्ड तसेच महापालिका, वीज, पाणी आणि ड्रेनेजसह नागरिकांच्या विविध प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी प्रशासनाला सोबत घेऊन सातत्याने प्रयत्न करणार आहे.
>
> **- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ.**

# न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या ६ विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेत यश






> “राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेत आपल्या ‘न्यू इंग्लिश मीडियम स्कूल’च्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश अत्यंत अभिमानास्पद आहे. खेळाडूंचे हे यश त्यांची मेहनत आणि प्रशिक्षकांचे अचूक मार्गदर्शन यांचे फलित आहे. क्रीडा क्षेत्रातही आपल्या शाळेचे विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर चमकत आहेत, याचा मला संस्थाचालक म्हणून मनस्वी आनंद आहे. सुवर्ण व रौप्य पदक विजेत्या सर्व खेळाडूंचे मी मनापासून अभिनंदन करतो आणि नोव्हेंबर महिन्यात शिर्डी येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्यांना संपूर्ण संस्थेच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देतो.
>
> **- विजय पवार, संस्थापक अध्यक्ष, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव.**

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सातारा येथील वाई येथे पार पडलेल्या १४ व्या राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेत न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगावच्या विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. २२ आणि २३ ऑगस्ट रोजी आयोजित या स्पर्धेत शाळेतील ६ खेळाडूंनी सहभाग नोंदवून पदकांची लयलूट केली असून, सर्वांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**

या स्पर्धेत आपापल्या वजन गटात उत्कृष्ट कौशल्य दाखवत स्वयंम माने, शाम माळी, उत्तम भाटी आणि भाग्यश्री गायकवाड यांनी सुवर्णपदक पटकावले. तर संजू भाटी व सार्थक मोरे यांनी चमकदार कामगिरी करत रौप्यपदकावर आपले नाव कोरले. या सर्व विजेत्या खेळाडूंची येत्या नोव्हेंबर महिन्यात शिर्डी येथे होणाऱ्या राष्ट्रीय युनिफाईट स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

खेळाडूंच्या या घवघवीत यशामुळे थेरगाव परिसरासह संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरातून क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक यशवंत माने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विजेत्या खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय पवार सर, सचिव अशोक मोरे सर, खजिनदार सुरेखा पवार मॅडम, संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, मुख्याध्यापिका विद्या नाईक मॅडम, अग्निस मॅडम, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष अभिनंदन केले असून पुढील राष्ट्रीय स्पर्धेतील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

MILLENNIUM EDUCATIONAL SOCIETY
कर्मस्य साफल्यम्

# The Magical Pencil

**One day, a little girl named Pari Who was a topper in her class, But she was poor, and her friends used to make fun of her. Every day, her friends used to bring expensive things, and they did not share anything with Pari because she was poor.**



One day, there was an old man on the road. The man was old and could not see properly. Pari's friends saw the old man, but they did not help him. Rather, they laughed at him. Pari saw him and helped the old man cross the road.

A pencil fell from the old man's pocket. Pari picked up the pencil and said, “Uncle, take your pencil.” But the old man was not there. She saw that there was a piece of paper with the pencil. It was written on the paper, “This is a magical pencil. Whatever you draw with it will become real. But you have to draw the picture and say ‘Abracadabra’ three times. This picture will become real. But there is one rule: do not misuse the pencil.”

She was very happy. She went home and drew a doll that she had drawn on paper. It became real when she said “Abracadabra” three times.

The next day, she went to school and drew a sharpener. She said the magic words and the sharpener became real. It was an expensive sharpener. Then her friends came, and she showed the sharpener to them.

Her friend asked, “What is this?” Pari said, “This is a sharpener. My aunt bought me from London.” Her friends said, “Show me, Pari!” Pari said, “No, this is very expensive.”

Priyadarshani SCHOOL & JR. COLLEGE

Later, her friends decided to play at Rubi's house. They brought their toys to play with. Pari drew one big teddy bear and a big toy car. She said, “Abracadabra” three times, and they became real.

Then she took the toy car and teddy bear and went to Rubi's house to play. Rubi and her friend were playing with a small car and a teddy bear.

Pari said, “These are very small toys. I have big toys. Why do you play with small toys and not with big toys?”

She threw the small toys away, and they broke. Then her friend started crying. She said, “I will not play with you. I am going home.”

When Pari took her magical pencil, it was broken. Then she heard the voice of the old man. He said, “You misused the pencil, and misusing the pencil is not a good thing.”

Then Pari understood her mistake. She regretted misusing the magical pencil and decided never to misuse anything again.

**Moral:** Don't Misuse Anything.

**ARADHYA DATTATRAY KHAIRE, GRADE V (Division:Spencer ) PRIYADARSHANI SCHOOL, MOSHI.**

# D. Y. Patil PGDM Institute Welcomes New Batch at Induction Ceremony 2026–28

**MahaEnews | PIMPRI-CHINCHWAD**

**D. Y. Patil PGDM Institute, Akurdi, Pune, hosted the Induction Ceremony for its new batch of PGDM students for the academic year 2026–28 on August 19, 2026. The ceremony marked the formal beginning of the students’ two-year journey in management education, with a focus on learning, leadership, professional development and industry readiness.**



The event brought together senior industry professionals and academicians who interacted with the incoming students and shared insights on the evolving business environment, professional expectations and the importance of developing a strong foundation for a successful career.

The ceremony was presided over by Mr. Anil Agnihotri, Country HR Director – India, Faurecia, who attended as the Chief Guest.

The Guests of Honour included Prof. (Dr.) Capt. Chandrashekhar Chitale, Former Head, Department of Management Sciences (PUMBA), Savitribai Phule Pune University; Mr. Ravinder Pal Singh, Director – Software Engineering, Amdocs; and Mr. Rahul Dabi, Deputy General Manager – Human Resource & People Services, ŠKODA AUTO Volkswagen India Private Limited.

The distinguished guests shared their perspectives and encouraged students to approach their management education with curiosity, discipline and a strong orientation towards continuous learning. Their interaction with the students highlighted the importance of bridging academic knowledge with practical industry requirements.

The programme was also supported by the institute’s leadership, including Rear Admiral Amit Vikram (Retd.), Campus Director, Dr. D. Y. Patil Educational Complex, and Dr. Shalaka Parker, Director, D. Y. Patil PGDM Institute, whose guidance continues to contribute to the institute’s academic and professional development initiatives.

The induction ceremony marked the beginning of a new chapter for the 2026–28 batch as they embark on their journey towards academic excellence, professional competence and leadership development at D. Y. Patil PGDM Institute.